# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

## दिनांक ०६.१२.२०२२

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि. ०५/१२/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या २०१ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन १,०२,४५०/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहित अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि.०५/१२/२०२२ रोजी दारूबंदी कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयामध्ये एकुण ०८ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतां कडुन एकुण ७,०१४०/—रू.किमतीचा अवैध दारूसाठा जप्त तसेच नाश करण्यात आला असुन आरोपीतां विरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**जुगार सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही. :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये जुगार खेळणाऱ्या विरूध्द दि.०५/१२/२०२२ रोजी जुगार कायद्या अंतर्गत पोस्टे सेनगाव येथे ०१ व आ.बाळापुर येथे ०१ अशा एकुण ०२ ठिकाणी छापा टाकुन आरोपी विरूध्द कार्यवाही करून त्यांचेकडुन जुगाराचे साहित्य व नगदी असा एकुण ४,९६०/—रूपये जप्त करण्यात आला असुन आरोपीतांविरूध्द जुगार कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**ई सी ॲक्ट सदराखाली विशेष मोहित अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये दि. ०५/१२/२०२२ रोजी फिर्यादी सुभाष पुरभा चव्हाण वय ४३ व्य.नौकरी पोहे कॉ ६०५ ने पोस्टे सेनगाव यांचे फिर्यादी वरून पोस्टे सेनगाव येथे कलम ३२८,२७२,२७३,१८८, भादवी सहकलम 26(2)(i),26(2)( iv),27(2)(e),30(2)(अ),59 अन्नसुरक्षा.अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असुन यातील आरोपीने त्याचे किराणा दुकानात गोवा १०० केसरयुक्त,विमल पान मसाला, केसरयुक्त, व्हि—१ नावाचे तंबाखु व तंबाखु जर्दा गुटखा हा लोकांच्या जिवीतास हानिकारक व अपायकारक व शरिरासाठी विषद्रव्य असलेला व शासनाने प्रतिबंधीत केलेला गुटख्याची जाणीपुर्वेक चोरटी विक्री करण्याचे उदेशाने ताब्यात बाळगुन त्यांची चोरटी विक्री करतानां मिळुन आला म्हणुन गुन्हा दाखल असुन आरोपीकडुन एकुन ९,७२५ रू चा मुदेमाल जप्त करण्यात आला आहे व पुढील तपास सेनगाव पोलीस करित आहेत.

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये दि. ०५/१२/२०२२ रोजी फिर्यादी तुकाराम गमाजी आम्ले वय ४८ नौकरी पोह/३९४ पोस्टे कुरूंदा यांचे फिर्यादी वरून पोस्टे कुरुंदा येथे कलम ३२८,२७२,२७३,१८८, सह अन्नसुरक्षा मानके कायदा कलम 26(2),(XIV),3(3)(डि),27(3)(ई),सह वाचन कलम ३०(२)(ऐ)शिक्षा पात्र कलम ५९ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असुन यातील आरोपीने मुदेमाल जवळ बाळगुन विक्री करण्याकरीता लोकांच्या जिवीताला हाणीकारक व शरीरासाठी विषद्रव्य असलेला व महाराष्ट्र

शासनाने विक्री साठवणुक वितरण करीता प्रतिबंधीत केलेला गुटखा सुंगधीत पानमसाला हा अवैध रित्या व चोरटी विक्री करण्याच्या उदेशाने स्वताजवळ बाळगत असतांना मिळुन आला म्हणुन गुन्हा दाखल असुन आरोपीकडुन एकुन १२,४२० रू चा मुदेमाल जप्त करण्यात आला आहे व पुढील तपास कुरुंदा पोलीस करित आहेत.

अपघात :—

दिनांक ०५/१२/२०२२ रोजी पोस्टे हिंगोली ग्रामीण येथे भगवान पि.उत्तमराव काळे वय ४५ धंदा शेती रा धानोरा काळे ता.पुर्णा जि परभणी यांचे फिर्याद वुरुन कलम २७९,३०४ अ भादवी अन्वये गुन्हा दाखल असुन चालकाने त्याच्या ताब्यातील ऑटो वेगात व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे मुलास जोराची पाठीमागुन धडक देवुन त्याचे मरणास कारणीभुत झाला म्हणुन गुन्हा दाखल करण्यात येवुन या संदर्भात हिंगोली ग्रामीण पोलीस तपास करित आहेत.

दिनांक ०५/१२/२०२२ रोजी पोस्टे हटटा येथे गंगासागर भ्र.सुदाम बुलाखे वय ४५ व्य. मजुरी रा विठल मंदीर जवळा बाजार ता औढा ना जि हिंगोली यांचे फिर्याद वुरुन कलम २७९,३०४ अ भादवी अन्वये गुन्हा दाखल असुन अज्ञात वाहन चालकाने त्याचे ताब्यातील वाहन हयगई व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे पती पायी घेवुन जात असलेल्या हातगाडयास समोरून जोराची धडक देवुन अपघात करून फिर्यादीचे पतीस गंभीर जख्मी करून त्याचे मरणास कारणीभुत झाला म्हणुन गुन्हा दाखल करण्यात येवुन या संदर्भात हटटा पोलीस तपास करित आहेत.

चोरी :— दिनांक ०५/१२/२०२२ रोजी फिर्यादी विश्वनाथ पिता तुकाराम चौधरी वय ४० व्य. वकीली रा पोलीस पाटील गल्ली कळमनुरी ता कळमनुरी जि हिंगोली यांचे फिर्यादी वरून पोस्टे कळमनुरी येथे कलम ४५७,३८० भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन यातील अज्ञात आरोपीने यातील फिर्यादीचे शेतातील घराचे कुलुप तोडुन घरामध्ये ठेवलेले १० क्वींटल सोयाबीन कोणीतरी अज्ञात चोरटयानी चोरून नेले म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात कळमनुरी पोलीस तपास करित आहेत.